# कुष्ठरोग

कुष्ठरोग हा अतिशय संसर्गजन्य आजार नाही आणि तो पूर्णपणे बरा होतो.

संसर्गजन्य स्थितीतील रूग्ण औषधोपचार सुरू केल्यावर लवकरच असंसर्गजन्य स्थितीत येतात.

ओळख :

- मायकोबॅक्टेरीअम लेपरी या जीवाणूमुळे संसर्ग होतो.
- तो नेहमी हात, पाय, चेहरा आणि त्वचेवर दुष्परिणाम घडवतो.
- सर्वसाधारणपणे तीन वर्षांच्या कालावधीत याची वाढ होते.

उपचार :

- **MDT Multi Drug Treatment** म्हणजे बहु औषधोपचार पध्दती
  औषधे - रिफॅम्पीसीन , क्लोफॅझिमीन /डॅप्सन
- MDT मुळे कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो , ही औषधे सर्व आरोग्य केंद्रात मोफत उपलब्ध आहेत.
- MDT सल्ल्यानुसार नियमितपणे व पूर्णपणे बरे होईपर्यन्त घेणे आवश्यक आहे.

भारत सरकारने "राष्ट्रीय कुष्ठरो निर्मुलन कार्यक्रम (NLEP)" भारतातून कुष्ठरोगाचे पूर्णपणे उच्चाटन करण्यासाठी हाती घेतला आहे.

अपंगत्व (संवेदना नाहिशा होणे आणि हात/पाय/डोळे यांत पंगुत्व येणे) उशीरा झालेल्या निदान व औषधोपचाराने तसेच संवेदना हरवलेल्या अवयवांची काळजी कशी घ्यावी याची योग्य माहिती नसल्याने अपंगत्व येते.




हे करावे :-

- एखादा संवेदनाहीन चट्टा शरिरावर आलेला नाही याची तपासणी नियमित करा , असा एखादा चट्टा आढळल्यास त्वरित तपासणी करून घ्या.
- कुष्ठरोग असल्याचे आढळल्यास MDT सुरू करावी.
- औषधोपचार पूर्ण करावेत त्याने रोग पूर्णपणे बरा होतो आणि पुढे येणारे अपंगत्वही टाळता येते.

हे करू नये :-

- त्वचेच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्याचे टाळणे
- शरिरावर आलेला चट्टा लपविणे
- भीती, कुष्ठरोग MDTने पूर्णपणे बरा होतो.
- MDT घेण्यासाठी आरोग्य केंद्रात नियमितपणे न येणे
- MDT दररोज नियमितपणे न घेणे

लक्षणें :

- त्वचेवर पुसट लालसर चट्टा येणे
- चट्टयाच्या ठिकाणी संवेदना नसणे
- शिरांना नुकसान झाल्याची लक्षणे -
  - हात / पाय यातील संवेदना नाहिशा होणे
  - हात, पाय व चेह-याच्या स्नायूत अशक्तपणा जावणवे
  - हात, पाय, चेहरा यांवर परिणाम होऊन कायमचे दोष निर्माण होणे.

महत्त्वाचे मुद्दे :-

- कुष्ठरोग झालेल्या व्यक्ती सहसा संसर्ग वाढविणा-या नसतात.
- विशेष प्रकारच्या प्रतिजैविकांच्या उपचाराने कुष्ठरोग बरा करता येतो
- कुष्ठरोग झालेल्या व्यक्ती कुटुंबात, समाजात सामान्य जीवन जगू शकतात तसेच कामकाजही करू शकतात.
- कुष्ठरोग झालेल्यांना वेगळे ठेवण्याची गरज नाही.
- MDT मुळे कुष्ठरोग पूर्णपणे बरा होतो, संक्रमित होण्याचे थांबते आणि अपंगत्वही येत नाही.

संदर्भ : http://nlep.nic.in/guide.html, http://www.who.int/lep/en/

**महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेच्या औषध माहिती केंद्राकडून प्रसिध्द करण्यात आले.**
dic.mspcindia.org